# पुणे महानगरपालिका

## शिक्षण विभाग प्राथमिक

### कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५

## जाहिरात

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) क्रीडानिकेतन शाळाकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६ महिने मुदतीकरताच करार पद्धतीने एकवट मानधनावर रक्कम रुपये १६,०००/- दर महावर क्रीडा मार्गदर्शक नेमणुका करावयाच्या आहेत. यासाठी खालील शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| शैक्षणिक पात्रता | कोणत्याही शाखेचा पदवीधर, बी.पी.एड. किंवा बी.एड. (फिजिकल) एम.पी.एड. अथवा एन.आय.एस. (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स) संस्थेचा ६ महिने किंवा १ वर्ष कालावधीचा कोर्स अथवा समकक्ष व्यावसायिक पात्रता किंवा किमान राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावर झालेल्या स्पर्धेत प्रावीण्यप्राप्त खेळाडू असावा. |
| अनुभव | क्रीडा मार्गदर्शक म्हणून किमान १ वर्ष कामाचा अनुभव आवश्यक. |

**क्रीडा प्रकार -** कबड्डी -१, खोखो-१, हॅण्डबॉल-२, थ्रो बॉल-१, योगासन-३, बॉल बॅडमिंटन-१, अॅथलेटिक्स-३, क्रिकेट-१, ज्युदो-१, तलवारबाजी-२, सेपाक टकरा-१, नेट बॉल-१ (एकूण १८ क्रीडा मार्गदर्शक)

| आरक्षण | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ३ | २ | ७ | १८ |

वरील पदसंख्येत कमी अथवा वाढ करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**वयोमर्यादा :-** दि. ३०/०९/२०२४ रोजी उमेदवाराची वयोमर्यादा ५० वर्षापेक्षा जास्त नसावी. जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारीख/शाळा सोडल्याचा दाखला/शालान्त परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी.

**अटी :-**

१. सदरचे पद हे अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे.

२. प्राप्त उमेदवारांच्या अर्जामधून पात्र झालेल्या उमेदवारांना खालीलप्रमाणे गुणदान देण्यात येईल व त्यामधून गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | गुणदान | बॅचलर इन फिजिकल एज्युकेशन (बी.पी.एड.) | मास्टर इन फिजिकल एज्युकेशन (एम.पी.एड.) | राज्य अथवा राष्ट्रीय क्रीडा सहभाग व प्रावीण्य | क्रीडा मार्गदर्शक कामाचा अनुभव | क्रीडा कौशल्य विषयक कोर्सेस (एन.आय.एस.) | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १० | १५ | १० | १०<br>अनुभव कालावधी<br>१ ते २ वर्षे = २ गुण<br>२ ते ४ वर्षे = ४ गुण<br>४ ते ६ वर्षे = ६ गुण<br>६ ते ८ वर्षे = ८गुण<br>८ ते १० वर्षे = १० गुण | ५ | ५० |

३. निवड झालेल्या उमेदवारांना विहीत नमुन्यात करारनामा करून द्यावा लागेल.

४. सदरची नेमणूक फक्त ६ महिन्यांकरिता देण्यात येईल. ६ महिने कालावधीनंतर सदर नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.

५. वरील पदे ही अस्थायी स्वरूपाची असल्याने या पदांवर कायम स्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

६. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७. निवडीच्या कोणत्याही स्तरावर अर्जदार अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

८. वरील शैक्षणिक/व्यावसायिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासुन दि. २७/०९/२०२४ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे मनपा, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-४११००५ या ठिकाणी कार्यालयीन वेळेत सकाळी १०:०० ते सायं. ५.४५ वा. पर्यंत समक्ष सादर करावेत. अर्जाचा नमुना कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येईल.

९. महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०. शासकीय व अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे व प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

११. अर्जदाराने आपले अर्ज शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपाने जाहिरातीमध्ये निश्चित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१२. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक नसल्याचे आढळून आल्यास व उमेदवार गैरवर्तन, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१४. उमेदवारांनी मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी देणे अनिवार्य आहे.

१५. वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणे कामी मोबाइल, एसएमएसचा वापर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(डॉ. राजेंद्र ब. भोसले)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

**जाहिरात क्र. १/६९२ दि. १९/०९/२०२४**

https://freesarkaariresult.in/